दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## ऑनलाइन फॅन्टसी गेमिंगवर अखेर बंदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सरकारने ऑनलाइन मनी गेमिंगवर बंदी घालणारे विधेयक मांडले होते. लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्यानंतर या विधेयकाला आज अखेर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही मंजुरी मिळाली आहे. म्हणजेच, आता या ऑनलाईन गेमिंगवर बंदी घालणाऱ्या या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले आहे.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हे विधेयक दोन्ही सभागृहात मांडले. देशातील ऑनलाइन गेमिंग उद्योग ३.८ अब्जांचा आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे देशातील ऑनलाइन गेमिंग उद्योगाला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, विधेयक मंजूर झाल्यापासून ड्रीम ११ आणि माय इलेव्हन सर्कल सारख्या फॅन्टसी गेमिंग ॲप्सनी त्यांच्या प्लॅटफॉर्मवर रिअल मनी गेम्स बंद केले आहेत. या कायद्यानुसार, दोषींना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

# यंदाही भक्तांचा प्रवास खड्ड्यातूनच

### गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांची निघण्याची तयारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

बाप्पाच्या स्वागतासाठी चाकरमानी कोकणासह रायगड जिल्ह्यात येण्याच्या तयारीला लागले आहेत. काही जण खासगी वाहनांने तर काही जण एसटी महामंडाच्या बसने प्रवास करणार आहेत. मात्र, मुंबई-गोवा महामार्गासह अलिबाग- रोहा, साळाव, तळेखार, तसेच ग्रामीण रस्त्यावरील खड्डे कायमच आहेत. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. मुसळधार पावसाने हे खड्डे अधिकच खोल झाले आहेत. त्यामुळे यंदाही गणेश भक्तांचा प्रवास खड्ड्यातून होणार असल्याचे दिसून येत आहे.



कोकणासह रायगड जिल्ह्यात गणे-शोत्सव सण थाटामाटात साजरा केला जातो. यंदा जिल्ह्यामध्ये १ लाख दोन हजार ४८४ गणेश मुर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी चाकरमान्यांची रायगडसह कोकणात निघण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण दोन दिवस तर काहीजण पाच दिवसांची सुट्टी काढून गणेशोत्सव साजरा करण्यासाठी रायगड व कोकणात येणार आहेत. मुंबई, ठाणे, बोरीवली, खार, विरार, वसई अशा अनेक ठिकाणी नोकरी, व्यवसायानिमित्त असणारे हजारो चाकरमानी येणार आहेत. बुधवारी (दि.२७) गणरायाचे आगमन होणार आहे. त्यामुळे रविवारपासून चाकरमानी गावी येण्याची शक्यता आहे. मुंबई- गोवा महामार्ग क्रमांक ६६ व पाली फाटा ( खोपोली ) वाकण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या मार्गावर गणेशभक्तांच्या वाहनांची वर्दळ असणार आहे. तीन हजारहून अधिक वाहने या मार्गावरून धावण्याची शक्यता आहे. परंतु, मुंबई गोवा महामार्गावरील चार पदरीकरणाचे काम गेल्या १४ वर्षापासून रखडले आहेत.

अनेक राजकीय नेत्यांची आश्वासने, आंदोलने, पाहणी दौरे झाले तरीदेखील अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही. चार पदरीकरणाचे काम अपूर्ण स्थितीत आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ता शोधावा लागत आहे. नुकतेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून एका वर्षात कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. नागोठणे पासून अवेटीपर्यंतच्या रस्त्यासह मुंबई- गोवा महामार्गावरील पनवेल ते पेण मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. अलिबाग-रोहा मार्गावरील वेलवली खानाव ते उसर तसेच साळाव ते तळेखार रस्त्यावर तर कार्लेखिंड ते रेवस मार्गावर खडड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. जिल्हा परिषद अंतर्गत येणारे ५० किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. या रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. आठवड्याभरापासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. या पावसात खड्डे खोल झाले आहेत. गणेशोत्सवासाठी आपल्या गावी येणाऱ्या चाकरमान्यांचा त्रास यंदाही कायम असल्याचे चित्र आहे.

### चाकरमान्यांच्या नशीबी तेच खड्डे

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या निकृष्ट कामामुळे नव्याने केलेल्या काँक्रीट रस्ताही दरवर्षी पावसाळ्यात खड्ड्यात जात आहे. सरकारच्या या ढिसाळ कारभाराने चाकरमान्यांच्या नशिबी तोच रस्ता, तेच खड्डे, अशी भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे.

## भरधाव टेम्पोने ५ वर्षीय आयुषला चिरडले

**दै.रायगड नगरी । पुणे**

आजीसोबत बाहेरगावी गेलेला नातू आपल्या गावात आला, आजी रिक्षातून उतरायच्या आधीच घाईगडबडीने रिक्षातून उतरून पळू लागला. तेवढ्यात भरधाव आलेल्या टेम्पोची जोरदार धडक बसली आणि त्यात पाच वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. रस्ता ओलांडताना पुन्हा एकदा बारामती तालुक्यात ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेत गुणवडी गावातील पाच वर्षीय आयुष निलेश लोंढे या चिमुकल्याचा मृत्यू झाला. आज संध्याकाळच्या वेळी बारामती डोर्ले वाडी रस्त्यावर गुणवडी गावच्या हद्दीत ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पाच वर्षीय आयुष हा त्याच्या आजीसोबत बाहेरगावी गेला होता. आज शुक्रवारी बाहेरगावाहून आजी आणि नातू दोघेही गुणवडीकडे आले. एका रिक्षाद्वारे गुणवडीकडे पोहोचताना आजी रिक्षातून उतरण्यापूर्वीच कधी एकदा घरी जातो असं झालेल्या आयुष हा आजी रिक्षातून उतरण्यापूर्वीच स्वतः रिक्षातून उतरत रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी बारामती बाजूकडून डोर्लेवाडीकडे निघालेल्या टेम्पोची त्याला जोरदार धडक बसली.

रस्ता ओलांडताना टेम्पोने दिलेल्या धडकेत आयुष या चिमुरड्याचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना बारामती-डोर्लेवाडी रस्त्यावर गुणवडी गावच्या हद्दीत घडली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला. पाच वर्षाच्या चिमुकल्याचा अपघाती मृत्यू झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पस-रली. दरम्यान, या घटनेनं काही काळ इथे वातावरण तणावपूर्ण बनलं होतं. बारामतीत गेल्या दीड महिन्यात रस्त्यावरील अपघाताचा हा चौथा बळी ठरला. बारामतीत ओंकार आचार्य व त्याच्या दोन मुलींचा मृत्यू झाल्यानंतर बारामती शहरातील वाहतूक व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल करण्यात आले. मात्र, रस्त्यावरील वाहतुकीत वाहनांचा वेग अजूनही तसाच राहिला आहे. त्या वेगाचा आज चौथा बळी गेला.

## मनसेचा मोर्चा एकनाथ शिंदेंच्या घरावर धडकणार ; गजानन काळेंचा निर्धार

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नेरुळ मधील चार भूखंड विकास आराखड्यात सामाजिक बाबींसाठी आरक्षित असताना सिडकोने हे भूखंड चढ्या दराने बांधकाम व्यवसायिकांना विकले असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते गजानन काळे यांनी केला आहे. या प्रकरणी मनसेने एकनाथ शिंदेंच्या घरावर मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे.



सिडकोने २६००० घरांची काढलेल्या सोडती मधील घरांच्या किंमती अत्यंत महाग असल्याने मागील अनेक महिन्यांपासून लढा उभा केला आहे. उपमुख्यमंत्री व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तीन वेळा बैठकीचे आश्वासन देऊन ही बैठकीस येण्यास टाळले.एवढे महिने होऊन सुद्धा राज्य सरकार किंवा सिडको अजून घरांच्या किंमती कमी करत नाही.या संबंधी मनसे प्रवक्ते व शहरअध्यक्ष गजानन काळे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. सिडको सोडतधारकांचा संयमचा बांध आता सुटत चालला आहे.सिडको अजून सर्व सामान्यांची किती परीक्षा बघणार असा प्रश्न विचारत राज्य सरकारने गणेशोत्सवापूर्वी या घरांच्या किंमती कमी नाही केल्या तर मनसे सिडको सोडत धारकांना घेऊन ठाण्यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरावर धडकेल असा इशारा गजानन काळे यांनी दिला.२० ते २५ टक्के घरांच्या किंमती कमी करण्याचं मान्य केलं होते.


सत्ताधारी पक्षाचे आमदार प्रविण दरेकर, विक्रांत पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे शशिकांत शिंदे यांनी हा विषय अधिवेशनात मांडला.मंत्री उदय सामंत यांनी या घरांच्या किंमती जास्त असल्याचे मान्य करत २० ते २५% नी घरांच्या किंमती कमी करू असे सभागृहात मान्य केला असताना घरांच्या किंमती कमी का होत नाहीत. मंत्रिमंडळ बैठकीत देवेंद्र फडणवीस यांना भेटत असताना ते हा प्रश्न मंत्रिमंडळ बैठकीत मांडून का सोडवत नाहीत असा प्रश्न गजानन काळे यांनी उपस्थित केला.तरी घरांच्या किंमती कमी नाही झाल्या तर गणेशोत्सव काळात सुद्धा मनसे ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या बंगल्याच्या बाहेर आंदोलन करेल असा इशारा गजानन काळे यांनी दिला.

## पनवेलमधील लकी स्पोर्टस नामांकित ट्रॉफीच्या दुकानात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील एका बंद ट्रॉफीच्या दुकानाचे शटर , कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील २ लाख रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

शहरातील जुने रतन टॉकीज समोर असलेल्या ट्रॉफीचे दुकान बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर, कडी कोयंडा तोडून दुकानातील ड्रॉवर मध्ये ठेवलेले २ लाख रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार दीपक सोनटक्के यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.




## सहा लाख ८५ हजारांची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एपीके फाईलच्या माध्यमातून बँक खात्यातून सहा लाख ८५ हजार रुपये काढून घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात १८ ऑगस्ट रोजी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अमित वर्मा हे सेक्टर सात, कामोठे येथे राहत असून त्यांनी एका विक्रेत्यास तीन लाख ६९ हजारांचा चेक दिला होता. त्यावेळी बँकेकडून त्यांना मेल आला आणि चेक बाबत पीपीएस फॉर्म सबमिट केलेले नसल्याने तो स्वीकारला जाणार नाही. त्यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र बँकेसोबत संपर्क झाला नाही. त्यांनी गुगलवर नंबर शोधला असता त्या नंबर वर कॉल केला यावेळी समोरील इसमाने व्हाट्सअप कॉल वर मोबाईल स्क्रीन शेअर करण्यास सांगितले. त्यानंतर एपीके फाईल ची लिंक पाठवली. त्यातील पीपीएस फॉर्म भरा असे सांगून त्यांनी तो फॉर्म भरून सबमिट केला. सबमिट केल्यावर त्यांच्या मोबाईल स्क्रीनवर तीस मिनिटांचा काउंटडाऊन दिसू लागला. ते समोरील व्यक्तीशी बोलत होते. काही वेळाने इंटरनेट बँकिंग मध्ये लॉगिन केले असता त्यांच्या खात्यातून दोन लाख रुपये डेबिट झाले. चुकून झाले असून ते परत ते पैसे येतील असे समोरून सांगितले. त्यानंतर ओटीपी येऊ लागले आणि त्यांच्या बँक खात्यातून व्यवहार झाले. असे एकूण सहा लाख ८५ हजार रुपये काढून घेऊन त्यांचे फसवणूक करण्यात आली.

## कर्जत पोस्ट ऑफिस मधील गलथान कारभार सुधारावा

### कर्जतच्या नागरिकांनी केली खा.बारणे यांच्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोस्ट ऑफिस मधील गलथान कारभार सुधारावा अशी मागणी कर्जत मधील सामाजिक कार्यकर्ते दिलीप आंबवणे यांनी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे केली आहे.

कर्जत पोस्ट ऑफिस हे तालुक्याचे पोस्ट ऑफिस असताना इथे गेली दोन महिने अपुरे कर्मचारी आणि त्यातच उपलब्ध कर्मचाऱ्यांची निष्क्रियता शिवाय सर्वर डाऊन ही कारणे वारंवार लाईट जाणे, जेनरटर अथवा इन्व्हर्टर चा अभाव यामुळे ग्राहक नागरिकांना गेले अनेक दिवस मनस्ताप सहन करावा लागत आहे,

तासनतास रांगेत उभ राहिल्या नंतर देखील खात्री नसते की आपले काम होईलच? अश्यातच जेमतेम ५ - ६ लोकांना बसण्याची व्यवस्था आहे उर्वरित लोकांना ताटकळत उभे रहावे लागते हे अजून एक दुर्दैव बर हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने ते कोणालाच जुमानत नाहीत हीच का सरकारची सर्वसामान्य लोकांच्या प्रति आस्था आहे का ? सरकारचे प्रतिनिधी म्हणून आपण या गोष्टींकडे लक्ष द्यावे ही विनंती,

एकतर गणेशोत्सव तोंडावर आला आहे आणि लोकांना त्यांचेच पैसे घेण्यासाठी ताटकळत बसावे लागते? हेलपाटे घालावे लागतात? यांची सेवा बँकांन प्रमाणे गतिमान का करत नाहीत! द्या ना सरसकट एटीएम कार्ड, ऑनलाईन सर्व्हिस सुरू करा. बर हा सर्वर त्यात कायमच रुसलेला हे असे का? याचा त्रास तर सगळीकडेच आहे.

पण तो पोस्टात जास्त का? की काम करायचे नाही म्हणून कारण? या पोस्ट ऑफिस मधे पैसे मोजण्याची मशीन सुद्धा नाही ही किती खेदाची गोष्ट आहे? खासदार श्रीरंग बारणे आपणास विनंती आहे की आपण सर्वात आधी कर्जत पोस्ट ऑफिस कर्मचारी द्या आणि किमान तीन खिडक्या सुरू व्हाव्यात. म्हणजे गर्दी नक्कीच आटोक्यात येईल.



## खूप शिकून मोठे झालात तरी आजी-आजोबांना विसरू नका : जे.एम.म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलचे विद्यार्थी खुप हुषार आहेत, दहावी-बारावीला ९५ ते ९९ टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी आपल्याकडे आहेत, या हुशार विध्यार्थांनी परदेशी नोकरी करण्यापेक्षा, भारतातच नोकरी किंवा धंदा करावा. भारतात ही खूप चांगल्या संधी त्यांच्यासाठी उपलब्ध आहेत. पण हे सर्व करताना आपल्या आई-वडिलांचा आणि आजी-आजोबांचा विसर पडू देऊ नका, असे आवाहन माजी नगराध्यक्ष जे. एम.म्हात्रे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.



ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल, यांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करीत असतो हा त्यांचा एक खूप चांगला उपक्रम असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा गुणगौरव तर होतोच,परंतु आजी- आजोबांनाही यातून खूप समाधान आणि आनंद मिळतो,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल येथे आयोजित या कार्यक्रमात दहावी-बारावी तसेच इंजीनियरिंग व अन्य शाखांमध्ये उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष जे. एम.म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला,

यावेळी संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर, उपाध्यक्षा माधुरी गोसावी, सेक्रेटरी सुनील खेडेकर, तसेच अन्य मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

या गुण गौरव सोहळ्यात, अंजली अनिल भोळे हिने एल.एल.बी.परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवील्या बद्दल तसेच राजेश लाड यांच्या मुलीला गेम डिझाईन मध्ये जागतिक स्तरावर विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश माणिक यांनी केले.

# संगीत सेवक – रायगड भूषण पं. उमेश चौधरी

२३ ऑगस्ट हा दिवस रायगडभूषण पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांचा वाढदिवस. स्वरांप्रती अपार निष्ठा, संगीतसेवा आणि समाजकारणाशी जोडलेली त्यांची कलावंताची वाटचाल यामुळे आज ते शास्त्रीय संगीत क्षेत्रातील एक मान्यवर नाव ठरले आहेत.भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा सात्त्विक वारसा आणि धार्मिक संस्कार यांमुळे पंडित उमेश चौधरी यांना लहानपणापासूनच स्वरांची गोडी लागली. बाबांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात आदराने घेतले जाते आणि शेकडो शिष्य त्यांना गुरुस्थानी मानतात. या परंपरेशी साजेशी जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि घराणेदार गायकीच्या रचनांचा अभ्यास करून नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न प्रशंसनीय आहे. त्यामुळे पंडित उमेश चौधरी यांचे नाव शास्त्रीय संगीतामधील गंभीर, अभ्यासू आणि परंपरेला न्याय देणाऱ्या आघाडीच्या गायकांमध्ये घेतले जाते. त्यांच्या रियाजातून तयार झालेल्या सादरीकरणांमध्ये घराण्याची ठाम छाप तर दिसतेच, पण त्याचबरोबर स्वतःची व्यक्तिमत्त्वपूर्ण शैलीही स्पष्ट जाणवते. बंदिशींचे मंथन, रागातील बारकावे अधोरेखित करण्याची त्यांची पद्धत आणि श्रोत्यांशी निर्माण होणारी सहज संवादात्मक नाळ यामुळे त्यांचे संगीत आजच्या पिढीलाही प्रेरणा देते. महाराष्ट्राला सांस्कृतिक वरदान लाभलेले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात येथील प्रज्ञावंतानी कर्त्वृत्वाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत. अफाट सौंदर्याने भरलेले निसर्ग तसेच गंधर्वाच्या गोड गळयातील स्वरश्री देखील इथल्या गायक कलावंताना निसर्गतःच लाभली आहे. त्यातून असाच एक स्वरप्रेमी वारकरी सांप्रदयाची पताका, शास्त्रीय संगीताचा वारसा सांभाळत समाजकार्य करता करता सांगीतीक वाटचाल करणारे संगीत सुरमयी व्यक्तिमत्व म्हणजे नवी मुंबईतील पनवेल तालुक्यातील रांजणपाडा येथील रायगड भूषण पंडित उमेश चौधरी. शिक्षणात पदवीधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'विशारद' पदवी, घेऊन पूर्ण केले. शास्त्रीय संगीताची आकाशवाणीची बी हाय ग्रेड, सुगम संगीताची बी ग्रेड, दूरदर्शनवर'योगियांचा देव'हया मालिकेचे संयोजन व पार्श्वगायन,सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष, पंडित भीमसेन जोशी गानगंधर्व पुरस्कार,रायगड भूषण, रायगड गौरव, अशी अनेक मानसन्मान आणि पुरस्कारांनी त्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मान झाले आहेत. शास्त्रीय गायनात स्वरमंडल (झंकार वाद्य) हे केवळ सुरेल साथीचे साधन नसून परंपरेशी, साधनेशी आणि गायनातील सूक्ष्मतेशी घट्ट निगडीत आहे. पंडित उमेश चौधरी यांना जगातील पहिले शुद्ध सोन्याचा मुलामा असलेले सुवर्ण स्वरमंडल यशवंत महाराज यांच्या हस्ते प्रदान झाले, हे त्यांच्या कलासाधनेचे आणि योगदानाचे मोठे गौरवचिन्ह आहे. अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान मिळाल्यामुळे या कार्यक्रमाचे ऐतिहासिक महत्त्व आणखीन वाढले आहे. ही केवळ पंडित उमेश चौधरी यांची वैयक्तिक गौरवकथा नसून



संपूर्ण भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेसाठीही एक अभिमानाचा क्षण ठरला आहे.

संगीत शास्त्रीय सिद्धांतानुसार गुरुंच्या मार्गदर्शनाखाली घराणेदार रचना पुनर्गठीत करून सादरीकरणाची भव्यता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न युवा पिढीपर्यंत पोहोचवणे म्हणजेच संगीतकलेचा खरा उत्कर्ष होय. अशीच संगीतसेवा व रागदारी संगीत कलेत स्वतःला अर्पण करण्याचे कार्य पं. उमेश चौधरी यांनी केले आहे. भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्या धार्मिक व सात्विक गुणांनी प्रेरित होऊन त्यांनी या क्षेत्रात पदार्पण केले. संगीत क्षेत्राला जबाबदारी मानून, बुवांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून पं. उमेश चौधरी यांनी गायनकलेतील प्रत्येक बारकावे आत्मसात केले. त्यामुळेच आज ते संपूर्ण भारतभर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करत आहेत. आकाशवाणीवर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करणारे वारकरी सांप्रदायातील रायगड जिल्ह्यातील ते एकमेव अद्वितीय आहेत. पं. चौधरींना पंडित ही उपाधी लाभली असली तरी ते स्वतःला आजही विद्यार्थी समजतात. नवनवीन शिकवण आत्मसात करण्याची वृत्ती, गुरुपरंपरेचे भान आणि संगीतकलेला वाहिलेली अखंड साधना या गुणांमुळे त्यांची गायकी देशाच्या कानाकोपऱ्यात आदराने स्वीकारली जात आहे. रसायनशास्त्राचे पदवीधर असलेले पं. उमेश चौधरी यांचा व्यावसायिक प्रवास उद्योगक्षेत्रातून सुरू झाला. परंतु अंतर्मनातील स्वरांचा शोध अखेरीस त्यांना संगीताच्या अथांग सागरात घेऊन गेला. २००३ मध्ये चेंबूर येथे झालेल्या अल्लादिया खाँ स्मृती समारंभात उस्ताद अस्लम हुसैन खान यांचे गायन ऐकून ते इतके प्रभावित झाले की त्यांनी तत्काळ त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. त्यानंतर नोकरीचा राजीनामा देत त्यांनी पूर्णवेळ संगीतसाधना आणि गान प्रवास सुरू केला. आज पं. उमेश चौधरी आग्रा व जयपूर-अत्रौली घराण्याचे प्रमुख वारसदार मानले जातात. संगीत म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर समाजसेवेचे आणि आत्मशुद्धीचे एक प्रभावी साधन आहे, हे आपल्या कार्यातून ज्यांनी सिद्ध केले ते म्हणजे पं. उमेश चौधरी. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे त्यांनी १९२ तास अखंड भजन महोत्सव यशस्वीरीत्या आयोजित केला आणि त्या अद्वितीय उपक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. संगीत क्षेत्राला समाजजागृतीचे माध्यम मानत त्यांनी अवयवदान सारख्या महत्वाच्या विषयावर लोकसहभाग घडवून आणला. तसेच म्युझिक थेरपी सारख्या उपक्रमांद्वारे संगीताच्या आरोग्यदायी अंगाला अधोरेखित केले. त्यांचे भजन व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम सह्याद्री दूरदर्शनवर वारंवार प्रसारित होऊन असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावे या हेतूने त्यांनी मासिक सभा या उपक्रमाची सुरुवात केली आणि अनेकांना संधी उपलब्ध करून दिली. गुरुजनांचा आशिर्वाद, रसिकांचे प्रेमळ पाठबळ आणि शिष्यांना दिलेले प्रामाणिक मार्गदर्शन या त्रिसूत्रीमुळे पं. उमेश चौधरी हे खरे अर्थाने शास्त्रीय संगीताचे सेवक म्हणून ओळखले जातात.

आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण स्वरांनी भारलेला राहो,

आरोग्य, आनंद आणि यशाचा मंगल गजर सतत घुमत राहो,

आपल्या कला-सेवेत अखंड ऊर्जा आणि प्रेरणा लाभो,

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**पं. शंकरराव गोडबोले**

# गणेशोत्सवात आरती, भजनाला लागणारी ढोलकी बाजारात दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सवात आरती, भजनाला लागणारी ढोलकी बाजारात दाखल झाली आहे. शहाराच्या सुरुवातीलाच ठिकठिकाणी ढोलकी विक्रेत्यांनी दुकाने थाटली आहेत. त्यामुळे बाजारात ढोलकीचा नाद नानादू लागला आहे. ढोलकी तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने यंदा ढोलकीची किंमत १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.



गणरायाचे आगमन २७ ऑगस्टपासून घरोघरी होणार आहे. पनवेल परिसरात ३० हजारा हून अधिक ठिकाणी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. काही ठिकाणी दीड दिवसाचे , पाच दिवसांचे, दहा दिवसांचे गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. यापार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील बाजारात गेल्या काही दिवसांपासून ढोलकी विक्रेत्यांनी आपली दुकाने ठिकठिकाणी थाटली आहेत. मुंबई, ठाणेसह राजस्थान येथून सहकुटुंब ढोलकी विक्रेते दाखल झाले आहेत. लहान ढोलक्यांपासून मोठ्या आकाराच्या ढोलक्या तसेच जंबे तयार करण्यापासून त्या विक्रीला ठेवण्यात आल्या आहेत. पुठ्यांसह फणस, आंबा, शिसव आदी लाकडांपासून तयार केलेल्या ढोलक्या बाजारात उपलब्ध झाल्याचे पहावयास मिळत आहे. वेगवेगळ्या आकाराच्या ढोलक्या रु १५०० रुपयांपासून चार हजारांपर्यंत बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे ढोलकी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची किंमत १५ टक्क्यांनी वाढली आहे. ता ढोलकीच्या किमतीमध्ये ५०० ते १००० रुपयांपर्यंत, तर पुठ्यांच्या ढोलकीच्या किमतीमध्ये १०० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा ढोलकीच्या किमतीत १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्यात वेगवेगळ्या आकाराचे जंबे २ हजार ५०० ते ५००० रुपये किंमत आहे.

# पनवेल महानगरपालिका व डेंटल वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने डेंटल क्लिनिकांना परवाना शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका व डेंटल वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २२ऑगस्ट रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे एका छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून डेंटल क्लिनिकांना परवाने देण्यात आले. यावेळी सुमारे १५० डेंटल क्लिनिकांना परवाने देण्यात आले.

उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या सूचनेनुसार हे परवाना शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी डेंटल वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रूचा वाळिंबे, सचिव वैभव ठक्कर ,समन्वय गोपाल शितोळे, खजिनदार आशिष बांदेकर उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब ,क, ड या कार्यक्षेत्रातील सर्व डेंटल क्लिनिक आस्थापनाना व्यवसाय परवाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७६, ४५४,४५८(२०व प्रकरण १४,१८,२९) नुसार सर्व आस्थापनांना व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे .

महापालिकेच्यावतीने १५० दिवस कार्यक्रम राबविण्यात येत असून या अंतर्गत 'पनवेल महानगरपालिका तुमच्या दारी ' या उपक्रमांतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले. सर्व डेंटल क्लिनिक



व्यवसाय धारकांना एका छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून त्यांना परवाना देण्याच्या उद्देशाने सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:००वाजेपर्यंत हे शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये एकूण १५० डेंटल व्यवसाय क्लिनिक धारक यांचे अर्ज व आवश्यकतेनुसार कागदपत्र तात्काळ भरणा करून त्यांना त्वरित व्यवसाय व्यवसाय परवाना देण्यात आले.

अशा पध्दतीचे शिबिर आयोजित केल्या बद्दल डेंटल वेलफेअर असोसिएशनच्या वतीने महापालिकेचे आभार मानण्यात आले.यावेळी महापालिकेचे अधिक्षक जयराम पादीर, लिपिक संतोष सोनवणे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> नोंदणी प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यासाठी महापालिकेने दूरदृष्टी आणि सक्रिय पुढाकार यामुळे केवळ अनुपालन सोपे झाले तसेच महापालिका आणि डेंटल क्लिनिक वर्ग यांच्यातील नाते अधिक दृढ झाले आहे. तसेच या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अथक परिश्रम घेतलेल्या पनवेल महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. त्यांचे प्रयत्न व सहकार्य खरंच प्रशंसनीय आहेत.
>
> **डॉ .गोपाल शितोळे, समन्वयक डेंटल वेलफेअर असोसिएशन**

# गणपती बाप्पाच्या आगमनापुर्वी रस्त्यावरील खड्डे तातडीने भरण्याची मनसेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील अनेक रस्त्यांची दुरावस्था ही पावसामुळे झाली आहे. रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. गणेशोत्सव हा महत्त्वाचा सण चार दिवसांवर येऊन ठेपला आहे.यामुळे गणपती उत्सवापूर्वी उरण तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजवत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी; अशी मागणी मनसेचे तालुकाध्यक्ष अँड सत्यवान भगत यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण चे उप अभियंता नरेश पवार यांच्या कडे दिलेल्या निवेदन पत्रकातून केली आहे.

मागील चार दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले असून अनेक रस्त्याची दुरवस्था झाली आहे.त्याचा त्रास हा गणेशोत्सवाच्या निमित्ताने बाजारात खरेदी करण्यासाठी जाणाऱ्या गणेश भक्तांना, नागरिकांना सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर मनसेचे तालुकाध्यक्ष अँड सत्यवान भगत यांनी मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभाग उरण चे उप अभियंता नरेश पवार यांची भेट घेऊन तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती गणेशोत्सवापूर्वी करण्याची मागणी केली.तसेच उरण तालुक्यात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवणार नाही यासाठी वाहतूक विभागाने अवजड वाहनांना गणेशोत्सवात दिघोडे, खोपटा रस्त्यावर बंदी घालण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी उरण वाहतूक विभागाला देण्यात आलेल्या निवेदन पत्रकातून केली आहे.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता नरेश पवार यांनी गणेशोत्सवापूर्वी तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.तसेच रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवणार नाही यासाठी वाहतूक विभागाचे पोलीस सतर्क राहणार असल्याचे उरण वाहतूक विभागाकडून मनसेच्या कार्यकर्त्यांना सांगण्यात आले आहे.यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, मनसेचे तालुकाध्यक्ष अँड सत्यवान भगत, मनसेचे नेते निर्दोष गोंधळी, शहराध्यक्ष राहुल पाटील, माजी उपसरपंच दिपक पाटील, विभाग अध्यक्ष राकेश भोईर, अनिल गावंड, बबन ठाकूर सह मनसेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# डम्परच्या धडकेत पोलिस जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डम्परने धडक दिल्यामुळे दुचाकीवरील पोलिस जखमी झाल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

महावीर लुबाळ हे तळोजा फेस टू तेथे राहत असून ते शीळ डायघर पोलिस ठाणे येथे रात्रपाळी करून घरी दुचाकीवरून जात होते.

मुंब्रा ते पनवेल मार्गावरील धानसर टोल नाक्याजवळील शुभम गोडाऊनच्या समोर आले असता पाठीमागून आलेल्या डम्परने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्या धडकेत ते खाली पडले आणि त्यांचे छातीला व पायाला दुखापत झाली आहे.

# ट्रेलर चालका विरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील बीएलआर समोरील रस्त्यावर ट्रेलर उभ्या प्रकरणी ट्रेलर चालका विरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंद्रीश राजभर ( वय २४ ) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या मध्ये भागी उभा करून वाहतुकीस अडथळा होईल अश्या तह्रेने उभा केल्याने त्याच्या विरुद्ध बीएनएस कलम २८५ अन्वय कारवाई करण्यात आली आहे.


**माणगांव नगरपंचायत, माणगांव**

ता. माणगांव, जि. रायगड, पिनकोड ४०२१०४

Email- nagarapanchayatmangaon@gmail.com. फोन नं. ०२९४०२६३०५६

जा.क्र./मानपं/लेखा/ ९५४/२०२५-२०२६ दिनांक २२/०८/२०२५

**जाहीर सुचना**

माणगांव नगरपंचायतीचे सन २०१५-१६ ते सन २०२४-२५ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक अंदाजपत्रक मंजुर झालेले असून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०३ अन्वये नगरपंचायतीच्या सुचना फलकावर प्रसिध्द करणेत आले आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माणगांव नगरपंचायत**



**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नुसरत शहा, प्लॉट नं.१३, रोड नं.०४, सेक्टर-११, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ०१ नारळ व ०१ आंबा अशी एकूण ०२ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.१३, रोड नं.०४, सेक्टर-११, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ नारळ व ०१ आंबा अशी एकूण ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | श्री.राजेश जगे, सेक्टर-१३, ए ५७/१, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ०१ उंबर तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सेक्टर-१३, ए ५७/१, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे रस्त्यावरील ०१ उंबर झाड हे धोकादायक पडण्याच्या स्थितीत असून सदर झाडाची मुळे घरात पसरल्याने भिंतीला तडे गेले असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/453/2025-PTAD


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महामार्गालगत असलेल्या हॉटेल, ढाबा चालक-मालक यांची बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पनवेल शहर व पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील महामार्गालगत असलेल्या हॉटेल, ढाबा, चालक-मालक यांची बैठक सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षतेखाली मंथन हॉल येथे घेण्यात आली

या बैठकीला मार्गदर्शन करताना सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांनी सांगितले की, आगामी गणेश उत्सव दरम्यान कोकणाकडे जाणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणे वर्दळ असल्याने वाहतूक कोंडी होणार नाही. या करीता ढाबा, हॉटेल, दुकान समोरील रोडवर वाहन पार्किंग होणार नाही याची दक्षता घेणे, पार्किंग तसेच हॉटेल परिसरात चांगल्या प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरा लावणे, वाहने अस्ताव्यस्त पार्क होणार नाही याकरिता जास्तीत जास्त सुरक्षारक्षक नेमणे, वाहतूक नियमनाकरिता आवश्यक ती पोलिस प्रशासनास मदत करणे, पार्किंग नियोजनासाठी पीए सिस्टीमचा वापर करणे, कोणीही मद्य विक्री करणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या बैठकीला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्यासह ३५ ते ४० हॉटेल, ढाबा चालक-मालक उपस्थित होते.


## गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


## जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे कि, सदनिका क्र.बी-२०५, प्लॉट क्र. सी-२, ज्ञानसारथी को-ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, सेक्टर १२, खारघर, ता. पनवेल जि. रायगड या पत्त्यावर क्षेत्रफळ-६२.१२ चौरस मिटर बिल्टअप ५१.७७ चौरस मिटर कारपेट व टेरेस ४.२८ चौरस मिटर, नोंदणी कृत दस्त क्रमांक उरण (पनवेल-२)/६५८/२००५ दि.१९/१/२००७ प्रमाणे श्रीमती अमिता मुक्तीदास बाराहाते यांचे नावे प्राप्त व स्थित आहे.

सदर सदनिके संबंधी आमचे अशिलांनी मिळकतीचे मालक श्रीमती अमिता मुक्तीदास बाराहाते यांच्याशी मिळकत विकत घेणे संबंधी अंतीम बोलणी केलेली आहे व ठराव केला आहे. श्रीमती अमिता मुक्तीदास बाराहाते यांनी सदर सदनिका आमचे अशिलांना ठरलेल्या रकमेत सर्व प्रकारे दावेमुक्त, मागण्यांपासून मुक्त विकण्याचे मान्य केलेले आहे.

सदर सदनिका व त्याच्या कोणत्याही भाग संबंधाने कुणाही व्यक्तीस विक्री, बदली, असाईन्मेंट, गहाणवट, अधिभार, शुल्क, नावे करणे, बक्षीस, न्यास, वारसा, व्यवसाय, ताबा, मालकी, भाडेपटटी, पोट-भाडेपटटी, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, लीज, सबलीज, लीन, देखरेख, बीक्वेस्ट वारसा, फॅमिली असाईन्मेंट, सेटलमेंट, कायदेशीर कारवाई, दिवाळखोरी, व कोणत्याही न्यायालयाचा निकाली आदेश व अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही भाग हक्क, दावा, लाभ, स्वारस्य, आक्षेप अथवा मागणी असल्यास त्यांनी तो कृपया लेखीस्वरूपात त्या पुष्टयर्थ मुळ कागद पत्रासह निम्न स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील पत्त्यावरील कार्यालयात ही नोटीस जारी झाल्यापासून १५ दिवासांचे आत रविवार सोडून सकाळी १० ते सायं ५ पर्यंत दाखल करावेत. अन्यथा अशा व्यक्ती व व्यक्तीचे दावे, हक्क सोडून देण्यात आल्याचे आणी / अथवा दुर्लक्षित केल्याचे समजण्यात येईल, व आमचे अशिल सदर सदनिके संधर्भात पुढील खरेदीव्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही तसेच माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही,

दिनांक : २३/०८/२०२५

सही/-

**ॲड.जे. बी. शिकलगार**
**(खरेदीदाराचे वकील)**
**गाळा क्र.२, प्लॉट क्र.सी-२, ज्ञानसारथी सह गृह संस्था मर्या सेक्टर-१२, खारघर, नवी मुंबई.**
**संपर्क क्र. ९३२३८६७६१४**

---

बोराडे-कपूर साो
अर्जदारचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिशसाहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९४६/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०९/२०२५

१) श्री. शमीक संतरा, वय ४३ वर्षे,
२) श्री. दिपतेंडु संतरा, वय ४० वर्षे,
क्र.१ व २ रा. ३५-आर, राधा माधव,
दत्त गार्डन लेन, सुभाष सरोवर पार्क,
बेलेघाटा, कोलकत्ता, पश्चिम बंगाल ७०० ०१०.
३) श्रीमती. दिप्ती दिपककुमार संतरा, वय ७२ वर्षे,
रा. फ्लॅट नं. १बी, नीओनेस्ट को. ऑप. हौ. सोसायटी,
जे-३८१, बीपी टाऊनशिप, झिल पार्क, पाटुली,
पंचेसयर, कोलकत्ता, पश्चिम बंगाल ७०००९४ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. दिपककुमार संतरा है दि.२१.०९.२०१९ रोजी अमृतसर पंजाब येथे मयत झाले असून, त्यांची खालील वर्णनाची मिळकत आहे.

मौजे खारघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर २० मधील प्लॉट नं. ७३ वर आस्तित्वात असलेल्या, पार्क डिव्ह या गृहप्रकल्पातील, इमारत क्र.ए मधील पहिल्या मजल्यातील, फ्लॅट नं. १०४, क्षेत्र १३८७ चौरस फुट बिलटप ९६.५० चौ. फुट टेरेस एकुण सेलेबल बिलटप एरिया १४८३ स्के. फुट अशा वर्णनाची मिळकत

अर्जदार हे कै. दिपककुमार संतरा यांचे, कायदेशीर वारसदार आ-हेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तिस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना. कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाया हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२१/८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रीम. अलका नामदेव मांडवकर व इतर राहणार-भानवज, ता. खालापूर, जि. रायगड-४१०२०३ यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी खरेदी खत करुन विकत घेण्याचे ठरवलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- भानवज, ता-खालापूर, जि-रायगड येथील**
**भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक-३१/२**
**एकूण क्षेत्र १.४७.०० (हे.आर) संपूर्ण क्षेत्र**

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास हि नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ७दिवसात खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दि.२२/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-

**ॲड. सचिन रोहिदास भोसले**
**गाळा नं.८, राज आर्केड, डॉ.म्हात्रे हॉस्पिटल समोर, वृंदावन हॉटेल शेजारी, लाईन आळी, पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड, ४१०२०६.**

---

अर्जदारातर्फे वकील
सौ.ज्योत्स्ना सो. कोळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९८६/२०२५
नि.नं.७
ने.ता.०४/०९/२०२५

१) श्रीमती. विमल कांतीलाल पाटील
वय ७३ वर्षे, व्यव- गृहिणी,
२) श्री. अपेक्षीत कांतीलाल पाटील
वय- ४८ वर्षे, व्यव- नोकरी,
३) श्री. नियोजीत कांतीलाल पाटील
वय- ४५ वर्षे, व्यव : नोकरी,
१ ते ३ रा. ई १/१०, सी -१०, सेक्टर १४,
सी.के.टी. हायस्कूलच्या पाठिमागे,
नवीन पनवेल (पुर्व), रायगड,
४) सौ. जागृती श्रीकांत पाटील
वय- ५१ वर्षे, व्यव : नोकरी,
रा. भडवळ पोस्ट: नेरळ ता. कर्जत जि. रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहिर नोटिसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र. १ चे पती २ ते ४ यांचे वडिल कै. कांतीलाल वामन पाटील, हे दिनांक ०२/०७/२०२४ रोजी सुश्रूषा हॉस्पीटल, नेरूल, नवी मुंबई, ठाणे, येथे मयत झाले आहेत. तसेच मयत यांची आई व अर्जदार यांची आजी कै. मुक्ताबाई वामन पाटील, हया रा.हमरापूर, ता. पेण, जि. रायगड येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. कै. कांतीलाल वामन पाटील, यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

| मौजे/युनिट केस नं./ ठिकाण | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. /चौ.मीटर/ चौ.फुट | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ई १/१०, सी/१०, सेक्टर १४, नवीन पनवेल | २३८ | ३९.७८ चौ.मीटर | १,२७,१०० |
| रूम नंबर एल-२, तळ मजला, एल विंग, ज्ञानेश्वर माउली को. ऑ. हौ. सोसायटी, विचुंबे, पनवेल | गट नं. ८०/२ | ४४० चौ.फुट | ५,५८,००० |
| कणे (घराचा जोता) | मालमत्ता क्रं.३७९ | ९०० चौ.फुट | २,१०० |
| हमरापूर (सि.पत्राचे घर) | मालमत्ता क्रं.३९१ | ७६८ चौ.फुट | १७,२७९ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असुन सदरहु जमिन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणे प्रमाणे वारस दाखला मिळणे करीता अर्जदारांनी मे, कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै. कांतीलाल वामन पाटील, यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना. कोर्टात दाखल करावि सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून ना. कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

# आ.प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा; कळंबोली शाळा फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळा अंतर्गत फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धेतून निवड झालेले एकूण ९ विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली. हे विद्यार्थी आता आंतर-शालेय फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानवर, जिल्हा उपाध्यक्ष तथा स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर, अशोक मोटे, केशव यादव, सुनीता हिरवळे, सुनील डेंबरे, राजेश पांडे, भाजयुमो कळंबोली शहर अध्यक्ष गौरव नाईक, दिलीप बिष्ट,आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावी मांडणी करून आपले विचार मांडले.

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याचा विकास, आत्मविश्वास वृद्धी तसेच समाजघडणीसाठी वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरली.

यावेळी गौरव नाईक यांनी म्हंटले कि, विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना योग्य दिशा देण्यासाठी या स्पर्धेने उत्तम संधी उपलब्ध करून दिली आहे.

वक्तृत्व ही केवळ कला नसून समाजाशी जोडणारे सामर्थ्य आहे. 'कोशिश फाउंडेशन'च्या सहकार्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांना आंतर शालेय स्तरावर चमक दाखवण्याची संधी मिळत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मौजे : खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढील वर्णनाची जमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल श्री. विलास भगवान मढवी यांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खांडस, ता.कर्जत, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | भुधारणा पद्धती क्रं. | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मनोहर भाऊ ऐनकर | वर्ग-१ | ७२/२० | ०.२४.०० | ०.२२ |

**एकूण क्षेत्रापैकी १० गुंठे जागा विकत घेणे आहे.**

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरिक्त सदर मिळकती संदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिन्हाईतांचे गहाण, दान, बक्षीस, उपरोक्त करारनामा, लीज, चार्ज, ॲटचमेंट, कुळहक्क, ताबा, कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा मनाई, आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर कोणत्याही प्रकारचे कुणाचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालीलप्रमाणे दिलेल्या पत्त्यावर सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दि.२२/०८/२०२५

सही/-

**ॲड.मनोज एस. गाढवे**
**BSL.LL.B**
**(उच्च न्यायालय)**

**शॉप क्रमांक १०१ नगरपालिका कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ जुने पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**मो नं. ८७७९६९३७९२/९८३३९६६३०४**

---

अर्जदारातर्फे वकील
सौ.ज्योत्स्ना सो. कोळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७९३/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०८/०९/२०२५

१) श्रीमती. विमल कांतीलाल पाटील
वय ७३ वर्षे, व्यव- गृहिणी,
२) श्री. अपेक्षीत कांतीलाल पाटील
वय- ४८ वर्षे, व्यव- नोकरी,
३) श्री. नियोजीत कांतीलाल पाटील
वय- ४५ वर्षे, व्यव : नोकरी,
१ ते ३ रा. ई १/१०, सी -१०, सेक्टर १४,
सी.के.टी. हायस्कूलच्या पाठिमागे,
नवीन पनवेल (पुर्व), रायगड,
४) सौ. जागृती श्रीकांत पाटील
वय- ५१ वर्षे, व्यव : नोकरी,
रा. भडवळ पोस्ट: नेरळ ता. कर्जत जि. रायगड अर्जदार

या जाहिर नोटिसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र. १ चे पती २ ते ४ यांचे वडिल कै. कांतीलाल वामन पाटील, हे दिनांक ०२/०७/२०२४ रोजी सुश्रूषा हॉस्पीटल, नेरूल, नवी मुंबई, ठाणे, येथे मयत झाले आहेत. तसेच मयत यांची आई व अर्जदार यांची आजी कै. मुक्ताबाई वामन पाटील, हया रा.हमरापूर, ता. पेण, जि. रायगड येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. कै. कांतीलाल वामन पाटील, यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

अर्ज मिळकत : कै. कांतीलाल वामन पाटील, यांचे नावे असलेली कमरशिअल

व्हेहीकल नं. MH06/BD-1191 LCV Ve Commercial Veh Ltd. Pro -1095

Chassis Number: MC2C5HRC0GC338265 Engine Number: E413CDGC076567

Year of Manufacture: March 2016 Date of Registration: 24/05/2016

Passenger Car Number: MH46/BQ4895 Make Model: Maruti EECO CNG 5 SEATER

WITH AC Chassis Number: MA3E-RLF1S00776777 Engine Number: G12BN760893

Year of Manufacture: November 2019 Date of Registration: 15/01/2020

Post office: PANVEL, Scheme: SB-GENRAL, Account No. 4476596142,

Name of depositer: Kantilal Vaman Patil, CIF: 330993857

या खात्यातील रक्कम रू १९,१९८/- (अक्षरी रू. एकोणीस हजार एकशे अठयाणव रूपये मात्र)

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असुन सदरहु जमिन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणे प्रमाणे वारस दाखला मिळणे करीता अर्जदारांनी मे, कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै. कांतीलाल वामन पाटील, यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना. कोर्टात दाखल करावि सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून ना. कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

# खो- खो स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्यावतीने आयोजित शालेय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू आहेत. कोकरे विद्यालयाच्या क्रीडांगणात संपन्न झालेल्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या खो-खो स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल वलंग विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त करून अव्वल स्थान निर्माण केले आहे. आपला कौशल्यपूर्ण खेळ प्रदर्शित करीत त्यांनी आपल्यासमोर आलेल्या प्रतिस्पर्धी संघांवर खिलाडी वृत्तीने मात करीत आगेकूच केली आहे. त्याबद्दल वलंग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनंत रेवाळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि कार्यवाह राजन कुर्डूनकर सर, उपाध्यक्ष दिलीप साळवी, माजी कार्यवाह प्रभाकर सागवेकर, तालुका क्रीडा समन्वयक राजुदास पवार सर यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक दीपेश जाधव सर यांचे अभिनंदन केले आणि जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


अर्जदारातर्फे वकील
ॲड.विवेक सदाशिव तावडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५०९/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०९/२०२५

१) श्री. सुरेश भिकाजी सावंत
वय : ६३, वय : निवृत्त
रूम नंबर बी-१०१, गुरु संकल्प को-ऑपरेटिव्ह
हाऊसिंग सोसायटी प्लॉट नंबर ३१, सेक्टर १ई,
कळंबोली रायगड महाराष्ट्र -४१०२१८
२) श्री. स्वप्निल सुरेश सावंत
वय ३६, व्यवसाय: नोकरी
फ्लॅट नंबर २०४, सिद्धेश्वर होम्स, प्लॉट नंबर १४२,
कळंबोली रोड कळंबोली महाराष्ट्र ४१०२१०
३) सौ. स्नेहा मनीष मोरे
वय : ३२, व्यवसाय : गृहिणी
बी- २४/११३, विश्वकुंज को. ऑप. हाउसिंग
सोसायटी., आरएससी १६, सेक्टर-०१, बेस्ट सुविधा
स्कूलच्या समोर गोराई, बोरवली-४०००११
४) श्री.तेजस सुरेश सावंत
वपः २८, व्यवसाय: नोकरी
रूम नंबर बी-१०१ गुरु संकल्प को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग
सोसायटी प्लॉट नंबर ३१, सेक्टर १ ई,
कळंबोली रायगड महाराष्ट्र -४१०२१८ अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीस द्वारे असे कळविण्यात येते की कै. सुवर्णा सुरेश सावंत यांचा मृत्यू दिनांक २७-११-२०२० रोजी जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे झाले आणि अर्जदार १) श्री. सुरेश भिकाजी सावंत, वय ६३, वय निवृत्त रूम नंबर बी १०१, गुरु संकल्प को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी प्लॉट नंबर ३१, सेक्टर १ई, कळंबोली रायगड महाराष्ट्र -४१०२१८, २) श्री.स्वप्निल सुरेश सावंत, वय ३६, व्यवसाय नोकरी, फ्लॅट नंबर २०४, सिद्धेश्वर होम्स, प्लॉट नंबर -१४२, कळंबोली रोड कळंबोली महाराष्ट्र ४१०२१००, ३) सौ. स्नेहा मनीष मोरे, वय: ३२, व्यवसाय-गृहिणी, बी २४/११३, विश्वकुंज को. ऑप. हाउसिंग सोसायटी., आरएससी १६, सेक्टर-०१, बेस्ट सुविधा स्कूल च्या समोर, गोराई, बोरवली-४०००९१ ४) श्री तेजस सुरेश सावंत, वय : २८, व्यवसाय: नोकरी, रूम नंबर बी-१०१ गुरु संकल्प को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ३१, सेक्टर १ ई, कळंबोली रायगड महाराष्ट्र-४१०२१८, यांनी या कोर्टात सदर मयत कै. सुवर्णा सुरेश सावंत यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**(स्थावर मिळकती)**

१) (५०% अविभक्त हिस्सा) फ्लॅट नंबर २०४, सिद्धेश्वर होम्स, दुसरा मजला, प्लॉट नंबर १४२, सेक्टर १ ई, कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१०२१८, (क्षेत्रफळ ३१.१३ चौ.मी. कार्पेट).

२) (५०% अविभक्त हिस्सा) दुकान क्रं-०४, तळ मजला, गुरु संकल्प को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ३१, सेक्टर-१ ई, कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा - रायगड , महाराष्ट्र-४१०२१८, (क्षेत्रफळ १९.९८ चौ. मी. बिल्टअप )

कै. सुवर्णा सुरेश सावंत यांच्या मृत्यूपश्वात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत सवय अर्जदार सदरचा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# गणरायाचे आगमन होणार खड्डेमय रस्त्यातून ; गणेशभक्तांमध्ये नाराजीचा सूर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना सुध्दा अद्यापही मुख्य मार्गावरील काही ठिकाणी खड्डेमय रस्ते झाले आहेत. त्यांची साधी डागडुजी सुध्दा केलेली नसल्याने याच खड्डेमय रस्त्यातून गणपती बाप्पाला धक्के झेलत प्रवास करावा लागणार असल्यामुळे गणेशभक्तांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटताना दिसून येत आहे.



दस्तुरी नाक्यापासून ते लायब्ररी पर्यंत सद्यस्थितीत क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात आले आहेत. परंतु त्यावेळी ह्या रस्त्यांची कामे करताना अत्यंत घाईगडबडीत पूर्ण केल्यामुळे बहुतांश भागातील निकृष्ठ क्ले पेव्हर ब्लॉकच्या जागी खड्डे पडले आहेत. याच मार्गावरून सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री उशिरा दहा वाजेपर्यंत ई रिक्षासह, घोडे, हातरीक्षा, पर्यटकांची मोठया प्रमाणात रहदारी सुरू असते. इंदिरा गांधी नगर या भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यासमोर जागोजागी खड्डे पडले आहेत. यातून मार्ग काढताना खूपच त्रासदायक बनलेले असून प्रवाशांना धक्के खात प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे बहुतेक सर्वच अधिकारी वर्ग याच ई रिक्षाच्या सेवेचा मनसोक्तपणे लाभ घेताना दिसून येत आहेत.

ई रिक्षाची सुविधा उपलब्ध झाल्यापासून जवळपास बहुतेक मंडळी यामध्ये अगोदर पासूनच ज्यांचा ई रिक्षा सुरू होण्यासाठी प्रखर विरोध होता आणि आजही कायम विरोध आहे अशी मंडळी या सेवेचा लाभ घेण्यासाठी अग्रेसर दिसत आहेत. कमी रिक्षा असल्यामुळे प्रवाशांना बऱ्याचदा ताटकळत उभे राहावे लागते परंतु कोणत्याही खात्याचा एखादा अधिकारी ई रिक्षाच्या स्टँडवर आला की सर्वात अगोदर त्यांना बसविले जाते आणि थेट त्यांच्या कार्यालयापर्यंत मोफत सेवा देण्यात येते यावरून अनेकदा पर्यटकांचे वाद होताना दिसत आहेत.सहा महिन्यांच्या पायलट प्रोजेक्ट मध्येच अधिकाऱ्यांना मोफत सुविधा देण्यात यावी असे नमूद केले होते परंतु ई रिक्षाच्या सेवेला एक वर्ष पूर्ण होऊन सुध्दा बहुतांश अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी सहकुटुंब या सेवेचा त्यांच्या ऑफिसपर्यंत मोफत लाभ घेत असून ही मोफत सुविधा बंद करण्यात यावी असे प्रवाशी नागरीक बोलत आहेत. हिल स्टेशन म्हणून नावारूपाला आलेल्या या ठिकाणी उत्तम दर्जाचे रस्ते नाहीत ही विदारक दृश्ये माथेरानच्या प्रतिमेला धोका निर्माण करणार असल्याचे सुध्दा जागरूक नागरिकांमधून बोलले जात आहे.

> माथेरान नगरपरिषदेच्या वतीने सेंट्रल हॉटेल ते टपालपेटी नाका या मुख्य मार्गांवरील खड्डे बुजविण्यात आले परंतु टपालपेटी नाका ते पशुवैद्यकीय दवाखाना या मार्गांवर असलेल्या खड्डयामुळे हातरीक्षा चालक,अश्वचालक,ई-रिक्षा चालक तसेच पर्यटक, नागरिकांना कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे त्यातच चार दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाच्या कालावधीत ई-रिक्षातून श्रीगणेश मूर्ती आणण्यास गणेशभक्तांना खूप त्रास सहन करावा लागणार असून खड्डयामुळे ई-रिक्षातून श्रीगणेश मूर्ती आणताना खड्ड्यांच्या खटक्यामुळे श्रीगणेश मूर्तिचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही याचा नगरपरिषदेच्या संबंधित विभागाने विचार करून लवकरात लवकर सदरच्या मार्गांवरील खड्डे बुजविण्याचे आदेश द्यावेत जेणेकरून गणेशभक्त,पर्यटक व नागरिकांना या मार्गांवरून प्रवास करताना व ई-रिक्षातून श्रीगणेशमूर्ती आणण्यास अत्यंत सोयीचे होईल.
>
> **चंद्रकांत जाधव, माजी उपनगराध्यक्ष,माथेरान**

# गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आल्यामुळे गावागावात चैतन्य संचारले

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात गणेशोत्सवाची धामधूम सुरू झाली असून, खेड्यापाड्यात वाडी वस्तीवरील सध्या चैतन्याच्या वातावरण निर्माण झाले आहे. बहुसंख्य तरुण मंडळी नोकरी व्यवसाय निमित्ताने नवीमुंबई,पनवेल,ठाणे, मुंबई व पुणे आदी ठिकाणच्या शहरात राहत आहेत. हि मंडळी गणेशोत्सवाला आवर्जून गावात येतात. शहराबरोबर गाव खेड्यातील स्थानिक बाजारपेठाही सजल्या असून, अनेक सार्वजनिक मंडळाकडून विविध प्रबोधनात्मक व लोकोपयोगी उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

चाकरमानी देखील गावी दाखल होऊ लागले आहेत.त्यामुळे घरात एकांतात राहणाऱ्या वृद्ध मंडळी, मुलेबाळे, नातवंडे आणि नातेवाईक घरी आल्याने सुखावली आहेत उत्सवानिमित्त गावागावात रेलचेल वाढली आहे. गावांना खऱ्या अर्थाने गावपण आले आहे. आर्थिक व्यवहारांना गती आली आहे. उरणच्या चिरनेर पूर्व विभागात भजन, कीर्तनाचे कार्यक्रम राबविले जातात. गणेशोत्सवात मिठाईला मोठी मागणी असते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी गणेशोत्सवात जिल्ह्यातील मिठाई उत्पादक, विक्रेते आणि हॉटेल व्यवसायांवर अन्न औषध प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. सर्व व्यवसायिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून केलेले आहे. सणासुदीच्या कालावधीमध्ये जनतेकडून मिठाई व इतर अन्नपदार्थ जसे खवा, मावा ,तूप रवा, मैदा ,आटा वनस्पती खाद्यतेल इत्यादीची मागणी मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील मिठाई उत्पादक, विक्रेते हॉटेल व्यवसायिकांना अन्न औषध प्रशासनाकडून दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

# सिडको घराचा मोह दाखवून महिलेची लूट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोच्या घरांच्या मोहामुळे एका ४१ वर्षीय महिलेची तब्बल साडेतीन लाखांची फसवणूक झाली आहे. सिडको अधिकारी असल्याचे भासवत राखीव कोट्यातून घर मिळवून देण्याचे आश्वासन देत एका व्यक्तीने ही लाखोंची लूट केली आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात पनवेल करंजाडे येथील आरोपीने स्वतःला सिडको अधिकारी असल्याचे भासवून मुंबईच्या ट्रॉम्बे परिसरात राहणाऱ्या महिलेची ओळख काढली. या महिलेचा विश्वास संपादन करत त्याने तिला रोडपाली येथील हंसध्वनी सोसायटीत नेले आणि येथील एक घर दाखवत घर मिळवून देतो असे आमिष दाखवले. यावर विश्वास ठेवून पीडित महिलेने त्या व्यक्तीच्या बँक खात्यात तब्बल ३ लाख ५५ हजार रुपये वर्ग केले.अनेक महिने उलटूनही घर न मिळाल्याने महिलेला फसवणुक केल्याचा संशय आला. याप्रकरणी तिने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. संशयीत आरोपीला चौकशीसाठी बोलावूनही त्याने प्रतिसाद न दिल्याने पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता फसवणूक टाळण्यासाठी जागरूक राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# सहाय्यक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर मिळाली पदोन्नती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम -२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ अंतर्गत सहाय्यक पोलीस निरीक्षकांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांक पासून पोलीस निरीक्षक पदावर त्यांनी पदोन्नती करून त्यांना संबंधित जागांवर नेमणूक करण्यात आली आहे.

परी मंडळ १ व परीमंडळ २ अंतर्गत कार्यरत असलेले राकेश रामदास पगारे यांची मुंबई शहर, राजेंद्र शंकर जाधव यांची रायगड, विश्वास प्रकाश भिंगारदिवे यांची नवी मुंबई विमानतळ, प्रभाकर केशवराव शीऊरकर यांची नवी मुंबई विमानतळ, सुषमा छबुराव पाटील यांची नवी मुंबई विमानतळ, मोनाली प्रमोद चौधरी यांची नवी मुंबई विमानतळ, शमी गणेश रानवडे यांची नवी मुंबई विमानतळ, बाबासाहेब जगनाथ पवार यांची गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महेश ईश्वर जानकर यांची नवी मुंबई विमानतळ, प्रवीण मोहन कदम यांची नवी मुंबई विमानतळ, दीपक अंबाजी कदम यांची नवी मुंबई विमानतळ, प्रकाश अर्जुन पवार यांची एएनटीएफ, धनराज रवींद्र प्रभाळे यांची नवी मुंबई विमानतळ, अरुण माणिक पढार यांची नवी मुंबई विमानतळ, अशोक चंद्रभान डमाळे यांची नवी मुंबई विमानतळ, दीपक जया गावित यांची नवी मुंबई विमानतळ, कृष्ण अण्णा धामापूरकर यांची नवी मुंबई विमानतळ, संतोष राजू चव्हाण यांची नवी मुंबई विमानतळ, संजय भगवानदास सादिगळे यांची नवी मुंबई विमानतळ, राजू देवबा आलदर यांची मुंबई शहर, प्रदीप दिनकर दुपटे यांची मुंबई शहर, विजय शंकर चव्हाण यांची लाप्रवी आदींना बढत्या पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई रश्मी शुक्ल यांच्या आदेशाने देण्यात आल्या आहेत.

# श्रीवर्धन तालुक्यातील दहा गावांचा शाश्वत विकास ; सौरऊर्जेद्वारे ग्रामीण भागात उजेड, पाणी व प्रगतीची नवी पहाट

**दै.रायगड नगरी । कापोली**

ग्रामीण भागातील शाश्वत आणि दीर्घकालीन विकास साधण्यासाठी दि प्राईड इंडिया आणि महानगर गॅस लिमिटेड या दोन संस्थांनी एकत्र येत श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले, खुजारे, बोर्ला, चिकलप, मेघरे, गुळधे, बापवली, साखरी, वावे-तर्फे-श्रीवर्धन आणि गाणी गावांमध्ये सौरऊर्जेवर आधारित विविध सुविधा उभारल्या आहेत. या उपक्रमाचा उद्देश फक्त मूलभूत सोयी-सुविधा पुरवणे नसून, ऊर्जा स्वावलंबी आणि पर्यावरणपूरक ग्रामीण विकासाचे शाश्वत मॉडेल निर्माण करणे हा आहे.

१५० सौर स्ट्रीट लाईट्स बसवून ग्रामीण रस्त्यांवर सुरक्षितता व प्रकाश व्यवस्था उपलब्ध झाली. ५ जिल्हा परिषदेच्या ग्रामीण शाळांमध्ये ऑफ-ग्रिड सौर ऊर्जा प्रणाली उभारून विद्यार्थ्यांना अखंडित शिक्षणाचा उजेड मिळाला. ५ सौर पंपाद्वारे पिण्याचे व शेतीसाठी पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करून शेतकरी व ग्रामस्थांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडले.

या उपक्रमामुळे स्वच्छ पाणी, सुरक्षित प्रकाश, सिंचनासाठी जलसंधारण यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या आहेत. ऊर्जेवरील खर्च कमी झाला असून कार्बन उत्सर्जन कमी झाले आणि ग्रामस्थांचा वेळ व श्रम वाचत आहे.अशा अनेक स्तरांवर सकारात्मक परिणाम घडले आहेत.

हा उपक्रम केवळ सुविधा उभारण्यापुरता मर्यादित नसून, ग्रामस्थांमध्ये सहभाग आणि पर्यावरणीय जाणीव निर्माण करण्यावरही भर देतो. ग्रामपातळीवर या उपक्रमाचे परिणाम दिसून येत असून, ही गावे आता ऊर्जा स्वावलंबी आणि पर्यावरणपूरक गावांच्या दिशेने वाटचाल करत आहे. या संपूर्ण प्रकल्पाला दि प्राईड इंडिया चे वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक गोपाल जाधव यांचे धोरणात्मक मार्गदर्शन लाभले आहे. क्षेत्रीय समन्वयक किशोर शिताळे यांच्या नेतृत्वाखाली, प्रांजली भायदे,रितु तोंडलेकर , राज कावनकर, रोशन दुर्गावले आणि प्रेरणा वाणी या फील्ड समन्वयकांच्या अथक प्रयत्नांमुळे प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला आहे. ग्रामस्थांनी या उपक्रमामुळे मिळालेल्या सुविधा, सुरक्षितता व सक्षमीकरणाबद्दल आनंद व्यक्त केला असून हा उपक्रम केवळ दिवे लावण्याचा नाही, तर आमच्या जीवनात आशेचा किरण आणि प्रगतीचा उजेड आणणारा आहे असे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.ह्या उपक्रमामुळे भविष्यात अनेक लोकांना लाभ होणार आहे.



# मुंबई-गोवा महामार्गावर गणेशोत्सव काळात जड वाहनांवर बंदी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

राज्यात सर्वत्र दि. २७ ऑगस्ट २०२५ ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेशोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. या काळात मुंबई-गोवा महामार्गावरून मोठ्या संख्येने गणेशभक्त प्रवास करतात. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ वर वाहतुकीची मोठी गर्दी होत असून गणेशभक्तांचा प्रवास सुखकर, सुरक्षित व सुरळीत होण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावर जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे. अशी माहिती अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) प्रविण साळुंके यांनी दिली आहे.



गृह विभागाचे सह सचिव (परिवहन) यांच्याकडून यासंदर्भात आदेश जारी करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे गणेशभक्तांना प्रवास करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी ही बंदी लागू करण्यात आली आहे. या बंदीचे तारखेप्रमाणे पालन करण्याची जबाबदारी वाहनधारक आणि संबंधित वाहतूकदार यांच्यावर राहणार आहे. तसेच या कालावधीत महामार्ग पोलिसांकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, गणेशभक्तांना कुठलीही अडचण आल्यास संबंधित जिल्ह्यांचे हेल्पलाईन व नियंत्रण कक्ष क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

हे निर्णय कोकणात प्रवास करणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीतील शिस्तीकरिता घेण्यात आले असल्याचे अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) प्रविण साळुंके यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# विमानतळ नोकरीच्या नावाखाली खोट्या जाहिरातींचा सुळसुळाट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन ऑक्टोबरमध्ये होणार असल्याने रोजगाराच्या नावाखाली खोट्या जाहिरातींचा बाजार नवी मुंबई व पनवेलमध्ये सुरू आहे. विमानतळात नोकरी लावतो, प्रशिक्षण मिळवून देतो, असे दावे करून उमेदवारांची फसवणूक होत आहे. यामुळे रोजगाराच्या आशेने धावणाऱ्या तरुणांनी सावधान राहावे, असे आवाहन संबंधित अधिकृत कंपन्यांना करावे लागत आहे.

विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनाची तयारी सुरू असून अदानी समूह आणि सिडको यंत्रणा काम करत आहेत.प्रकल्पग्रस्तांना सेवा क्षेत्रात प्राधान्याने रोजगार मिळावा, यासाठी प्रकल्पग्रस्त २७ गाव समितीसह लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. अदानी समूहाने सध्या विमानतळाच्या स्वच्छता व सुविधा विभागासाठी बीव्हीजी कंपनीची नियुक्ती केली आहे.

या कंपनीमार्फतच प्रशिक्षण आणि रोजगाराची निवड होणार आहे. उमेदवारांनी खोट्या जाहिरातींचा बळी पडू नये, त्याऐवजी अधिकृत संकेतस्थळावरूनच माहिती घ्यावी, असे आवाहन बीव्हीजी कंपनीने केले आहे.यादीनुसारच प्रशिक्षण व रोजगार काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर एक खोटी जाहिरात व्हायरल झाली. यात विमानतळात नोकरीसाठी अर्ज मागविले जात असल्याचे नमूद होते.

बीव्हीजी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही जाहिरात फसवी असल्याचे स्पष्ट केले आहे. कोणत्याही स्वतंत्र एजंट किंवा संस्थेमार्फत भरती करत नसून, ८८ उमेदवारांच्या यादीनुसारच प्रशिक्षण व रोजगार दिला जात असल्याचे व्यवस्थापक विपेन टिक्कू यांनी सांगितले.

# गणेशोत्सव सण पार्श्वभूमीवर नगरपंचायत, पोलीस प्रशासनाने वाहतूक कोंडी समस्या बाबत निर्णय घ्यावा

**दै.रायगड नगरी । तळा**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून तळा रिक्षा स्टँड ते बळीचा नाका पर्यंत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी हि नित्याची बाब आहे. परंतु गणेशोत्सवात काळात जादा बस मोठ्या प्रमाणावर व नियमीत एस.टी बस, सेवाखाजगी वाहने, प्रवासी वाहने येत असतात. त्याबरोबर मोटार सायकल, रिक्षा, मिनिडोअर, याची जास्त प्रमाणात वाढ होते.

श्री गणपती दर्शनासाठी पाहुण्यांची गर्दी होते वाहनांची कोंडी होते. व बाजारपेठेत खरेदी साठी नागरिक गर्दी होत असते. यामुळे वाहनचालकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. वेळ प्रसंगी वादविवाद होतो. तर कधी मोठा तंटा होतो. तरी नगरपंचायत प्रशासनाने व पोलिस प्रशासशाने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होणार नाही अशी उपाययोजना कराव्यात. पोलीस प्रशासनाने या काळात पोलिस कर्मचारी तैनात ठेवावेत जेणे करून वाहतूक कोंडी होणार नाही व नगरपंचायत प्रशासनाने पार्किंग ची व्यवस्था करावी अशी मागणी शहरवासीयांकडून केली जात आहे.

# रायगड जिल्ह्यात गणपती उत्सवाची धूम ; प्रशासनाची जोरदार तयारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गणेशोत्सव अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला असून, जिल्ह्यात सर्वत्र उत्सवाचे वातावरण निर्माण जाले आहे. नाक्यानाक्यावर उत्सवाची चर्चा आहे. आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी भक्त सज्ज होत आहेत. २७ ऑगस्टरोजी जिल्ह्यात १ लाख २ हजार ४८४ गणपतीमूर्तींची स्थापना करण्यात येणार असून, मूर्तीकारांची लगबग सुरु आहे. जिल्ह्यात उत्सव काळावधीत कायदा व सुव्यस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. बाप्पाच्या सजावटीचे साहित्य तसेच पूजेचे साहित्य घेण्यासाठी बाजारपेठांमध्ये गर्दी होत आहे. सोशल नेटवर्किंग साईटवरदेखील गणपती उत्सवाचीच धूम असल्याचे चित्र दिसून येते.

२७ ऑगस्टपासून गणपतीउत्सव साजरा करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात घराघरात गणपती उत्सव साजरा करण्यात येणार असून, जिल्ह्यात १ लाख २ हजार ४८४ गणपती मूर्तींची विधीवत प्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. यामध्ये १ लाख २ हजार १९८ खासगी तर २८६ सार्वजनीक गणपती मूर्तींचा समावेश आहे. गणेशोत्सवासाठी नागरिकांनी घरामध्ये रंगरंगोटी केली असून, गणपतीसाठी मखरे तयार करण्यात भक्त व्यस्त आहेत. तसेच नाक्या-नाक्यावर गणेशोत्सवाचीच चर्चा सुरु आहे.

गणेशोत्सव जवळ आल्याने काही गणेशभक्त गणपती मूर्ती आपापल्या घरी गेऊन जाऊ लागले आहेत. तर बहुतांश गणेशभक्त रविवार (दि.२४) पासून गणपती मूर्ती आपल्या घरी घेऊन जातील. काही गणपती मूर्ती कारखान्यांमध्ये गणपती मूर्तींचे काम सुरु आहे. झिंग, हिरे तसेच इतर साहित्याने मूर्ती सजविण्यात येत आहेत. वेळेत मूर्ती सजविण्याचे काम पूर्ण करण्यासाठी कारखान्यांमध्ये दिवस-रात्र तास काम सुरु आहे.

गणोशोत्सव शांततेत तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन तसेच पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. रायगड जिल्ह्यात जनावबंदी आदेश जारी करण्यात आला आहे. या कालावधीत मोर्चे, निदर्शने तसेच ज्वलंत पदार्थ व हत्यारे जवळ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. उत्सव काळावधीत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या नागरिकांना तात्पुरते स्वरुपात तडीपार करण्यात येत आहे. तसेच यापूर्वीच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची जिल्हा प्रशासन तसेच पोलीस विभागाने बैठका घेतल्या असून, त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्सवात पोलीस बंदोबस्तात वाढ करण्याबरोबरच, नेहमीच्या गस्तीतही वाढ करण्यात आली आहे. बंदोबस्तासाठी राज्य राखीव दल तसेच होमगार्डची मदत घेतली जाणार आहे.

